Page No.
Date: / /

नाव:- अवंतिका संतोष लोंढे
तुकडी:- ब
रोल नंबर:- २१८

# मराठी भाषा गौरव दिवस

२७ फेब्रुवारी हा दिवस आपण मराठी राजभाषा दिन म्हणून मोठ्या उत्साहात साजरा करतो. हा दिवस महाराष्ट्राचे ज्येष्ठ कवी, लाडके साहित्यकार, ज्ञानपीठ पुरस्कार विजेते थोर लेखक, नाटककार वि.वा. शिरवाडकर उर्फ कुसुमाग्रज यांचा जन्मदिवस! कुसुमाग्रजांनी अनेक सरस कथा, कादंबऱ्या, निबंध, लघुकथा, नाटक, कविता इ. यांचे कुशल लेखन केले. त्यांची विशाखा ही कादंबरी भारतीय साहित्यातील उत्कृष्ट कार्य व आधुनिक मराठी काव्याचे कायमचे भूषण ठरले आहे. नटसम्राट सारखे अजरामर नाटक कुसुमाग्रजांच्या प्रतिभेची ओळख पटवून देते.

मराठी ही सर्वांगसुंदर भाषा आहे. मराठी ही भारतातील अधिकृत २२ भाषांपैकी एक भाषा आहे. भारतात सर्वात जास्त बोलली जाणारी मराठी ही तिसरी भाषा आहे. महाराष्ट्र तसेच गोवा या २ राज्यांची मराठी ही अधिकृत राजभाषा आहे. मराठीची साहित्यसंपदा विपुल आहे. तिला थोर परंपरा लाभली आहे.

मराठी भाषा अनेक संतांच्या कीर्तनांनी, भारूडांनी, ओव्यांनी, भजनांनी सजली आहे. ती अनेक मराठी साहित्यिकांच्या प्रतिभासंपन्न अशा लेखनींनी समृद्ध, संपन्न झाली आहे. थोर संत ज्ञानेश्वर माउली मराठीची थोरवी गाताना म्हणतात की,

Page No.
Date: / /

माझा मराठीची बोलू कौतुके,
परि अमृतातेही पैजासी जिंके,
ऐसी अक्षरे रसिके। मेळवीन

मराठी भाषा अमृतालाही पैजेने जिंकणारी आहे. तिचा गोडवा अमृतापेक्षाही अधिक आहे. हिंदवी स्वराज्याचे संस्थापक छत्रपती शिवाजी महाराजांनी मराठी भाषेचे व संस्कृतीचे रक्षण केले. त्यांनी मराठी भाषेसाठी पहिला राजकोश तयार केला.

मराठी भाषा दिन किंवा मराठी राजभाषा गौरव दिन हा सर्व शाळा, कॉलेजमध्ये तसेच सरकारी कार्यालयात अनेक उपक्रमाद्वारे साजरा केला जातो. अनेक ठिकाणी मराठी नाटक, कविता, वक्तृत्व, निबंध, स्नेहसंमेलनाचे आयोजन केले जाते.

माझ्या मराठी मातीला नका म्हणू हीन दीन
स्वर्गलोकांहून थोर, मला हिचे महिमान
रत्नजडित अभंग, ओवी अमृताची सखी
चारी वर्णातूनी फिरे, सरस्वतीची पालखी.